"दैनिक दिव्य मराठी"

"Divya Marathi"

दिनांक :- 02 / 08 / 2018

Date :- 02 / 08 / 2018

## सोलापूर परिसर

# सोलापूर विद्यापीठाच्या वतीने उत्कृष्ट महाविद्यालय, प्राचार्य, कर्मचाऱ्यांचाही गौरव



विद्यापीठाच्या वतीने अजितकुमार संगवे, डॉ. व्ही. बी. पाटील, प्राचार्य डॉ. महिबूब दलाल, डॉ.सचिन गेंगजे यांच्यासह उत्कृष्ठ महाविद्यालयाचा पुरस्कार लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयाचा पुरस्कार प्राचार्य डॉ. साळुंखे यांना प्रदान करण्यात आला.

"दैनिक दिव्य मराठी"
"Divya Marathi"

दिनांक:- २६/०७/२०१८
Date:- 26/07/2018

कार्यशाळा | अल्पसंख्याक शिष्यवृत्ती विषयावर मार्गदर्शन

# विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाचा वापर व्यवसायासाठी करावा

प्रतिनिधी । सोलापूर



सय्यद अहसान

'विद्यार्थ्यांनी फक्त नोकरीकरिता शिक्षण घेऊ नये. स्वतःच्या व्यवसायाकरता आपल्या शिक्षणाचा वापर करावा, असे आवाहन मुंबईचे अल्पसंख्याक शिष्यवृत्तीचे तज्ज्ञ सय्यद अहसान यांनी केले.

नूर सोशल वेल्फेअर अँड चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सोशल आर्ट्स अँड कॉमर्स महाविद्यालयात अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर इक्बाल अन्सारी, अ. कय्युम अलीम, फैज इनामदार, खादिमाने उर्दू फोरमचे अध्यक्ष विकार अहमद शेख, ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. इसाक मुजावर उपस्थित होते.

या वेळी बोलताना सय्यद अहसान म्हणाले, विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन आपले शिक्षण पूर्ण करावे. जेणेकरून शिक्षणासाठी एक पैसाही लागणार नाही. विविध शिष्यवृत्तींची माहिती नसल्यामुळे अनेक विद्यार्थी याच्या लाभापासून वंचित राहतात.

सोशल मीडियावर असलेली शिष्यवृत्तीची माहिती विद्यार्थ्यांनी प्राप्त करावी, तसेच शिक्षकांनी याची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.

प्रा. इसाक मुजावर यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर सखोल माहिती दिली. सूत्रसंचालन मेहमूद नवाज यांनी केले तर आभार मन्नान शेख यांनी मानले.

कार्यक्रमासाठी रफीक खान, प्रा. जैनोद्दीन पटेल, इक्बाल बागबान, हमीदअली, सबील नाईक, इम्रान जमादार, जावीद काझी, अय्युब नल्लामंदू आदींनी परिश्रम घेतले.



अल्पसंख्याक शिष्यवृत्ती या विषयावरील कार्यशाळा झाली. या वेळी उपस्थित शिक्षक व विद्यार्थी.

## ऑनलाइन अर्जाची मोफत सुविधा

**शिष्यवृत्तीची माहिती देणारा एक कक्ष बाराईमाम खादिमाने उर्दू फोरमच्या कार्यालयात सुरू करण्यात आला आहे. या कक्षात विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती आनलाइन भरण्याची मोफत सुविधा करण्यात आली. तरी विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन नूरचे सचिव नजीर मुनशी यांनी केले.**

"दैनिक लोकमत"
"Lokmat"

दिनांक :- ३१/०८/२०१८
Date :- 31/08/2018

# वनिता सावंत-चंदनशिवे यांना पीएच.डी.

लोकमत न्यूज नेटवर्क



**सोलापूर** : सोलापूर सोशल महाविद्यालयातील संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थिनी वनिता जगन्नाथ सावंत-चंदनशिवे यांना सोलापूर विद्यापीठाकडून वाणिज्य शाखेची पीएच.डी. पदवी जाहीर करण्यात आली आहे. 'अ क्रिटिकल स्टडी ऑफ ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट वुईथ स्पेशल रेफरन्स टू सोलापूर म्युनिसिपल कॉर्पोरेशन' या विषयावर त्यांनी आपला शोधप्रबंध सोलापूर विद्यापीठास सादर केला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.ए.दलाल यांनी मार्गदर्शन केले.

"दैनिक लोकमत"
"Lokmat"

दिनांक :- ३१/०८/२०१८
Date :- 31/8/2018


सोलापूर सोशल
महाविद्यालयाचे प्राचार्य

# डॉ. एम. ए. दलाल

यांना सोलापूर विद्यापीठाने
**उत्कृष्ट प्राचार्य म्हणून**
**सन्मानित केल्याबद्दल**

## हार्दिक अभिनंदन!

व पुढील कार्यास शुभेच्छा !




## मा. प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल

एम.कॉम, पीएच.डी., एम.ए., एम.फिल, एल.एल.बी., डी.बी.एम.,
डी.एच.ई., जी.डी.सी. ॲण्ड ए., डी.लिट (युएसए)

शुभेच्छुक



एन.एम. खलिफा | एम.ए. अचकल | सलाम एन. खलिफा | मुस्ताक खलिफा | मुस्ताक चौधरी | नसीम भाई खलिफा



इमरान मुस्ताक बागवान | मतीन बागवान | डॉ. मोहसीन एम दलाल | मतीन एम. दलाल | एम.आय. दलाल

**एन.एम. खलिफा ॲण्ड सन्स**
फ्रुट, ओनियन ॲण्ड व्हेजिटेबल कमिशन एजंट,
ई-६१/६२, मार्केट यार्ड, सोलापूर.
मो. ९४२०२०११११

**एम.ए. अचकल ॲण्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंट, फ्लॅट नं. २,
उमर कॉम्प्लेक्स, १६९, तेलंगी पाच्छा पेठ,
सोलापूर.
मो. ९४२२४५८८८०

**सलाम एन. खलिफा**
फ्रुट ॲण्ड व्हेजिटेबल कमिशन एजंट,
सी-३, मार्केट यार्ड, सोलापूर.
मो. ९४२२०६८२१६

**मुस्ताक खलिफा**
भारत ट्रेडिंग कंपनी,
टोमॅटो ॲण्ड व्हेजिटेबल सप्लायर ॲण्ड
कमिशन एजंट, सी-३२, मार्केट यार्ड, सोलापूर.
मो. ९४२०७०२७७७

**मुस्ताक चौधरी**
सरदार हुसेनसाब ॲण्ड सन्स,
ओनियन ॲण्ड पोटॅटो कमिशन एजंट,
ए-८, सी-३६, मार्केट यार्ड, सोलापूर.
मो. ९८२२२०६८६८

**नसीम भाई खलिफा**
सोलापूर ओनियन कंपनी,
फ्रुट, ओनियन ॲण्ड व्हेजिटेबल कमिशन एजंट,
९-ए, मार्केट यार्ड, सोलापूर.
मो. ९४२३३३११११२

**इमरान मुस्ताक बागवान (MMM)**
रॉयल फ्रुट्स,
फ्रुट ॲण्ड व्हेजिटेबल कमिशन एजंट,
सी-१४, मार्केट यार्ड, सोलापूर.
मो. ९८२२१०७१८६

**मतीन बागवान**
ए-वन फ्रुट कंपनी,
फ्रुट ॲण्ड व्हेजिटेबल कमिशन एजंट,
ए-१४, मार्केट यार्ड, सोलापूर.
मो. ९८२२२०६००४

**डॉ. मोहसीन एम दलाल**
मुस्कान डेंटल क्लिनीक,
७१३, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर.

**मतीन एम. दलाल**
एम ३ प्रोडक्शन प्रा.लि.,
७१३, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर.

**एम.आय. दलाल**
ॲथोराईज्ड डिलर ऑफ टाटा शक्ती (ऑल टाईप्स ऑफ शिड्स)
१४२, गणेश पेठ, सोलापूर. मो. ९४२२३८०८३०

" दैनिक पुढारी "

" Pudhari "

दिनांक :- ०१ ०९/२०१८

Date :- 01 09/2018

# वनिता सावंत यांना पीएच.डी.

**सोलापूर (प्रतिनिधी) :** सोलापूर सोशल महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थिनी वनिता जगन्नाथ सावंत यांना सोलापूर विद्यापीठाकडून वाणिज्य शाखेची पीएच.डी. पदवी जाहीर करण्यात आली. 'अ क्रिटिकल स्टडी ऑफ ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट वुईथ स्पेशल रेफरन्स टू सोलापूर म्युनिसिपल कार्पोरेशन' हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता.



प्राचार्य एम. ए. दलाल यांनी त्यांना मार्गदर्शन केले. या यशाने वनिता सावंत यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

"तरुण भारत"
"Tarun Bharat"

दिनांक :- ०६/०९/२०१८
Date :- 06/09/2018

# बेस्ट फिजिकमध्ये 'सोशल'चा काझी प्रथम

क्रीडा प्रतिनिधी
सोलापूर, दि. ५ सप्टेंबर



सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन बेस्ट फिजिक स्पर्धेत येथील सोलापूर सोशल आर्टस् अॅण्ड कॉमर्स महाविद्यालयाचा विद्यार्थी सुहेल काझीने ८६ किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावला.

तसेच ५५ ते ६० किलो वजनगटात सोशलच्याच शाजेब शेख याने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेतून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरीता सुहेल काझीची निवड करण्यात आली.

वरील खेळाडूंना क्रीडाशिक्षक डॉ. मुश्ताक शेख व प्रा. एल.ए. वड्डो यांचे मार्गदर्शन लाभले. वरील दोघांना प्राचार्य डॉ. एम.ए. दलाल यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

" संकाळ "
" Sakal "

दिनांक :- २१/०९/२०१८
Date :- 21/09/2018

# महाविद्यालयांना प्रत्येकी दोन कोटी अनुदान मंजूर

सोलापूर शहर व जिल्ह्यातील १० संस्थांना लाभ वृत्त पान ९ वर »

**या कॉलेजचा समावेश**

- डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स
- ए. आर. बुर्ला वरिष्ठ महिला महाविद्यालय
- एच. एन. कॉलेज ऑफ कॉमर्स
- वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय
- छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय
- संगमेश्वर महाविद्यालय
- डी. बी. पी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय
- सोशल असोसिएशनचे आर्ट्स अँड सायन्स कॉलेज
- डी. बी. एफ. दयानंद आर्ट्स अँड सायन्स कॉलेज
- स.म. शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते

"संचार"
" Sanchar "

दिनांक :- २१/०९/२०१८
Date :- 21/09/2018

# विद्यापीठ संलग्न दहा महाविद्यालयांना 'रूसा'कडून प्रत्येकी २ कोटी अनुदान

संचार प्रतिनिधी

▶ **सोलापूर**, दि.२०- राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रूसा) 'इन्फ्रास्ट्रक्चर ग्रँट टू कॉलेज' या स्किम अंतर्गत सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित जिल्ह्यातील दहा महाविद्यालयांना प्रत्येकी दोन कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे. एकाच विद्यापीठातील दहा महाविद्यालयांचा अनुदानासाठी पात्र यादीत समावेश झाल्याने सोलापूर विद्यापीठाचे हे मोठे यश मानले जात आहे.

विद्यापीठातील 'रूसा' विभागाने यासाठी 'चॅलेंज लेव्हल फंडिंग' या विषयावर एक कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये 'रूसा'चे तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. विजय जोशी व अक्षय कदम यांनी ग्रँट (अनुदान) याविषयी मार्गदर्शन केले होते. ही कार्यशाळा या महाविद्यालयांना हे अनुदान मिळविण्यासाठी खूप मदतीची ठरली आहे. ही कार्यशाळा आयोजित करण्यासाठी कुलगुरू डॉ.मृणालिनी फडणवीस यांचे मार्गदर्शन लाभले. तर, शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभागाचे विशेष कार्यासन अधिकारी डॉ. व्ही.बी. पाटील यांनी यासाठी पाठपुरावा केला होता. रूसा कार्यालय, मुंबई यांच्याकडून महाविद्यालयांसंदर्भात मागविण्यात येणारी माहिती विद्यापीठातील रूसा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी दिली.

डॉ. व्ही.बी.पाटील यांनी रुसा कार्यालय मुंबई येथे बैठकीस वेळोवेळी उपस्थित राहून यासंदर्भातील सादरीकरण अचूकपणे केले होते. यामुळे विद्यापीठाशी संलग्नित तब्बल दहा महाविद्यालये प्रत्येकी दोन कोटी रुपयांच्या अनुदानासाठी पात्र यादीत समाविष्ट झाली आहेत. याबद्दल विद्यापीठातील अधिकारी वर्ग व महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होतो आहे.

## अनुदानास पात्र महाविद्यालये

संगमेश्वर महाविद्यालय, डी.बी.एफ. दयानंद महाविद्यालय, डी.ए.व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, डी.बी.पी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, ए.आर. बुर्ला वरिष्ठ महिला महाविद्यालय, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, एस.एस. ए. सोलापूर सोशल असोसिएशनचे कला व शास्त्र महाविद्यालय (सर्व सोलापूर शहर), सहकारमहर्षी शंकरराव मोहिते- पाटील महाविद्यालय नातेपुते (ता.माळशिरस).

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

"तरुण भारत"
"Tarun Bharat"

दिनांक :- २१/०९/२०१८
Date :- 21/09/2018

# १० महाविद्यालयांना 'रुसा'चे २ कोटी अनुदान

## ग्रामीण भागातील फक्त एका महाविद्यालयांस संधी

**प्रतिनिधी,**
**सोलापूर,दि.२० सप्टेंबर -**

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रूसा) 'इन्फ्रास्ट्रक्चर ग्रँट टू कॉलेज' या स्किम अंतर्गत सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित जिल्ह्यातील दहा महाविद्यालयांना प्रत्येकी दोन कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे. एकाच विद्यापीठातील दहा महाविद्यालयांचा अनुदानासाठी पात्र यादीत समावेश झाल्याने सोलापूर विद्यापीठाचे हे मोठे यश मानले जात आहे.

विद्यापीठातील 'रूसा' विभागाने यासाठी 'चॅलेंज लेव्हल फंडींग' या विषयावर एक कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये 'रूसा'चे तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. विजय जोशी व अक्षय कदम यांनी ग्रँट (अनुदान) याविषयी मार्गदर्शन केले होते. ही कार्यशाळा या महाविद्यालयांना हे अनुदान मिळविण्यासाठी खूप मदतीची ठरली आहे. ही कार्यशाळा आयोजित करण्यासाठी कुलगुरू डॉ.मृणालिनी फडणवीस यांचे मार्गदर्शन लाभले. तर, शैक्षणिक,संशोधन आणि विकास विभागाचे विशेष कार्यासन अधिकारी डॉ.व्ही.बी. पाटील यांनी यासाठी पाठपुरावा केला होता. रूसा कार्यालय, मुंबई यांच्याकडून महाविद्यालयांसंदर्भात मागविण्यात येणारी माहिती विद्यापिठातील रुसा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी दिली. डॉ.व्ही.बी.पाटील यांनी रुसा कार्यालय मुंबई येथे बैठकीस वेळोवेळी उपस्थित राहून यासंदर्भातील सादरीकरण अचूकपणे केले होते.

यामुळे विद्यापीठाशी संलग्नित तब्बल दहा महाविद्यालये प्रत्येकी दोन कोटीच्या अनुदानसाठी पात्र यादी समाविष्ठ झाली आहेत. याबद्दल विद्यापीठातील अधिकारी वर्ग व महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे अभिनंदनाचा वर्षाव होतो आहे.

### अनुदानास प्राप्त महाविद्यालये

संगमेश्वर महाविद्यालय, डी.बी.एफ. दयानंद महाविद्यालय, डी.ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, डी.बी.पी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, ए.आर. बुर्ला वरिष्ठ महिला महाविद्यालय, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, एस.एस.ए. सोलापूर सोशल असोशिएशनचे कला व शास्त्र महाविद्यालय (सर्व सोलापूर शहर), सहकारमहर्षि शंकरराव मोहिते- पाटील महाविद्यालय नातेपुते (ता.माळशिरस).

" दैनिक तरुण भारत "

" Tarun Bharat "

दिनांक :- ०९/१०/२०१८

Date :- 09/10/2018



## सोशल महाविद्यालयात रासेयोचा शुभारंभ

**सोलापूर, दि. ८ ऑक्टोबर-**

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थी श्रमदान करतो त्यामुळे शिक्षणाबरोबरच त्यांच्यामध्ये देशसेवेची भावना वृंध्दिगत होते. असे मत सोशल महाविद्यालयाच्या रासेयोच्या कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल होते. व्यासपीठावर डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. नभा काकडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक नारायणकर, डॉ. टी. बी. लदाफ उपस्थित होते. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक नारायणकर यांनी केले. परिचय दडापीर मुल्ला यांनी केले. कार्यक्रमास प्रा. सचिन राजगुरु, डॉ. गौस शेख आदी उपस्थित होते.

"दैनिक दिव्य मराठी"
"Divya Marathi"

दिनांक :- ०९/१०/२०१८
Date :- 09/10/2018

**दिव्य मराठी विशेष** • महात्मा गांधी, कस्तुरबा शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त व्याख्यान

# शांततेच्या मार्गानेच प्रश्न सुटतील : उत्पल

प्रतिनिधी । सोलापूर

आपल्या भोवताली घडणाऱ्या प्रश्नांकडे गांधींच्या दृष्टिकोनातून पाहणे, ते सोडविण्यासाठी शांततेचा मार्ग स्वीकारल्यास अनेक प्रश्न सुटतील. ते विचार समाज उपयोगी आहेत, असे प्रतिपादन वनिता उत्पल यांनी केले.

महात्मा गांधी व कस्तुरबा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती निमित्ताने सोलापूर विद्यापीठ, महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज, शिवलाल शहा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सोशल महाविद्यालयात आयोजिलेल्या व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते.

'मी, माझे प्रश्न आणि बापू (गांधी)' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. प्राचार्य एम. ए. दलाल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रा. मंगलमूर्ती धोकटे, डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्राणिमित्र विलास शहा, प्रा. नरेश बदनोरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. एस. नारायमकर, डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. टी. बी. लडाफ आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. दलाल म्हणाले, "गांधींजीचे विचार चिरंतन आहे. युवकांनी त्या विचारांचे अनुकरण केल्यास यशस्वी वाटचाल निश्चित होईल." सुरवातीला रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उदघाटन झाले. डॉ. नभा काकडे यांनी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. एम. नारायणकर यांनी आभार मानले.



सोशल महाविद्यालयात आयोजिलेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन झाडांना पाणी घालून झाले.

## मतभेद मिटवण्यासाठी गांधीजींच्या विचारांचे अनुकरण करावे

उत्पल म्हणाले, की गांधींचा विचार जीवनप्रकाश दाखविणारा आहे. त्यांच्याकडे भक्तीने पाहण्याऐवजी स्वतःच्या नियमित व्यवहारांमध्ये त्याचा समावेश करावा. दोन घटकांमधील संघर्ष, सीमाप्रश्न यासह छोट्या-मोठ्या गोष्टींवरून होणारे मतभेद मिटविण्यासाठी गांधींच्या विचारांचे अनुकरण आवश्यक आहे. मनामध्ये निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे उत्तर गांधींजींचे विचार, तत्वाद्वारे शोधण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी युवक-युवतींना केले.

"दैनिक संचार"
"Sanchar"

दिनांक :- ०९ / १० / २०१८
Date :- 09 / 10 / 2018

# महात्मा गांधी यांच्या विचारात अनेक प्रश्नांची उत्तरे

## 'सोशल'मध्ये झाले उत्पल यांचे व्याख्यान

**शहर संचार**

**सोलापूर, दि. ८-** महात्मा गांधी यांचे विचार मानव केंद्रित तितकेच समाजोपयोगी असून अनेक प्रश्नांची उत्तरे आजही आपल्याला त्यांच्या विचारातून मिळू शकतात, असा विश्वास उत्पल वनिता बाबूराव (पुणे) यांनी व्यक्त केला.

सोशल महाविद्यालयात महात्मा गांधी व कस्तुरबा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्णजयंती महोत्सव समितीतर्फे आयोजित व्याख्यानात आठवे पुष्प गुंफताना उत्पल बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल हे होते. याप्रसंगी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत प्रा. नरेश बदनोरे, प्रा. मंगलमूर्ती धोकटे, प्राणिमित्र विलास शहा आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. ए. ए. गढवाल यांनी करून दिला. उत्पल पुढे म्हणाले, महात्मा गांधी यांचा विचार जीवनाला प्रकाश दाखविणारा आहे. त्यांनी सांगितलेली नीतीमूल्ये प्रत्येक क्षेत्राला आजही तंतोतंत लागू पडतात. त्यामुळे त्यांचा विचार जगण्यासाठी करणे महत्त्वाचे आहे.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. दलाल यांनी महात्मा गांधी यांचे विचार चिरंतन असून विद्यार्थ्यांनी ते आत्मसात करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास प्रा. डॉ. जे. के. मुल्ला, डॉ. एस. ए. राजगुरू यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नभा काकडे यांनी केले. तर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. एस. नारायणकर यांनी आभार मानले.



**सोलापूर : सोशल महाविद्यालयात गांधी जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानाचे उद्घाटन करताना वक्ते उत्पल वनिता बाबूराव, प्रा. नरेश बदनोरे, प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल व अन्य.**

"दैनिक दिव्य मराठी"
"Divya Marathi"

दिनांक:- १७/०१/२०१९
Date:- 17/01/2019

# सोशलच्या आठ खेळाडूंची विद्यापीठ संघात वर्णी



विद्यापीठ संघात निवडलेले सोशल महाविद्यालयाच्या खेळाडूंसमवेत प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, डॉ. मुश्ताक शेख.

**क्रीडा प्रतिनिधी । सोलापूर**

सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस् अँड सायन्सच्या आठ खेळाडूंची सोलापूर विद्यापीठ संघात यंदाच्या शैक्षणिक वर्षात निवड झाली. सर्वात जास्त चार खेळाडूंची हॉकी संघात तर व्हॉलीबॉल, बास्केबॉल, फुटबॉल व शरीरसौष्ठव स्पर्धेत प्रत्येकी एका खेळाडूंची वर्णी लागली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. मुश्ताक शेख व एल. ए. वड्डो यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांनी अभिनंदन केले.

**विद्यापीठ संघात निवडलेले खेळाडू :** हॉकी : मोहसीन मुल्ला, अबुसलीम शेख, जुनेद पिरजादे व मुसद्दीक शेख. व्हॉलीबॉल : अबरार शेख, बास्केटबॉल : फय्याज अहमद, फुटबॉल : याहिया किल्लेदार, शरीरसौष्ठव : सुहेल काझी.

"दैनिक तरुण भारत"

"Tarun Bharat"

दिनांक:- १७/०१/२०१९

Date:- 17/01/2019



# आंतरविद्यापीठ स्पर्धेत 'सोशल'चे खेळाडू

**क्रीडा प्रतिनिधी**

**सोलापूर, दि. १६ जानेवारी**

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता सोलापूर विद्यापीठ संघात सोशल महाविद्यालयाच्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. सन २०१८-१९ करीता सोलापूर विद्यापीठ संघात निवड करण्यात आलेले खेळाडू :

हॉकी : मोहसीन मुल्ला, अबुसलीम शेख, जुनेद पिरजादे व मुसद्दीक शेख. व्हॉलिबॉल : अबरार शेख, बास्केटबॉल : फय्याज अहमद, फुटबॉल : याहिया किल्लेदार, बेस्ट फिजिक : सुहेल काझी.

या विद्यार्थ्यांची निवड ही सोलापूर विद्यापीठ संघात आंतर महाविद्यालयीन स्पर्धा तसेच संयुक्त शिबिरातून उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे करण्यात आली.

सर्व यशस्वी खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक डॉ. मुश्ताक शेख व प्रा. एल.ए. वड्डो यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना प्राचार्य एम.ए. दलाल यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

"दैनिक संचार"
"Sanchar"

दिनांक :- १७/०१/२०१९
Date :- 17/01/2019

## बिराजदार याची संचलनासाठी निवड



सोलापूर, दि. १६- शिवाजी पार्क, दादर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक संचलनाकरिता सोशल महाविद्यालयातील विद्यार्थी अर्शिद बिराजदार याची निवड झाली आहे.

राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन सराव शिबिर २४ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर दरम्यान नागपूर विद्यापीठ येथे पार पडले. या शिबिरामध्ये सोलापूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागातून बिराजदार याने सहभाग नोंदविला होता. या शिबिरातून त्याची निवड करण्यात आली आहे.

"तरुण भारत"
"Tarun Bharat"

दिनांक- १९/०१/२०१९
Date- 19/01/2019



## प्रजासत्ताक दिनासाठी बिराजदार याची निवड

**सोलापूर, दि.१८ जानेवारी -** तरुण भारत 19/1/19

२६ जानेवारी शिवाजी पार्क दादर मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक संचलनाकरीता सोशल महाविद्यालयतील विद्यार्थी आर्शिद बिराजदार (बी.ए. भाग २) या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन सराव शिबीर दि. २४ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर दरम्यान नागपूर विद्यापीठ सेवा योजना विभागातून बिराजदार यांनी सहभाग नोंदवला होता. या शिबीरातून त्याची निवड करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, डॉ. डी. एस. नारायणकर, डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. टी. बी. लडाफ, कॅप्टन डॉ. जी. एन. शेख व डॉ. नभा काकडे तसेच प्राध्यापक यांनी त्यांचे अभिनंदन केले.

"दैनिक संचार"
" Sanchar"

दिनांक :- १९/०१/२०१९
Date :- 19/01/2019





सोलापूर : सोशल महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन वृक्षास पाणी घालून करताना डॉ. सचिन राजगुरू, प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, डॉ. एन.जी. शिंदे, डॉ. सागर माळी व अन्य.

नोकरीच्या संधी यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. दलाल म्हणाले, भूगोल हा विषय देश विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असून विद्यार्थ्यांनी जी.आय.एस. तंत्रज्ञानाच्या माहितीचा उपयोग करून घ्यावा.


कार्यक्रमाचे स्वागत डॉ. सचिन राजगुरू यांनी केले. आभार डॉ. नारायणकर यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. नभा काकडे यांनी केले. कार्यशाळेस विविध महाविद्यालयातील ५० विद्यार्थी तसेच डॉ. हरीश तिपे, डॉ. डी. जी. शिंदे, डॉ. डी. डी. देडे, डॉ. बी.बी. राऊत, डॉ. एन. आय. धायगुडे, डॉ. निंबर्गी, प्रा. इंगळे, डॉ. लोंढे व डॉ. मंजू संगेपान उपस्थित होते.

"दैनिक तरुण भारत"
"Tarun Bharat"

दिनांक- २२/०१/२०१९
Date:- 22/01/2019

# सोशल महाविद्यालयात भूगोल कार्यशाळा

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-** सोशल महाविद्यालय व सोलापूर विद्यापीठ भूगोल शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ स्तरीय कार्यशाळा पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम.ए. दलाल, डॉ. एन जी. शिंदे, डॉ. आर.जे. मोहोरकर, डॉ. सचिन राजगुरु, व डॉ. डी.एस. नारायणकर उपस्थित होते.




डॉ. शिंदे यांनी भूगोल दिनाचे महत्व सांगितले व डॉ. मोहोरकर यांनी भूगोल विषयातील नोकरीच्या संधी यावर व्याख्यान दिले. डॉ. एम. ए. दलाल म्हणाले की, भूगोल हा विषय देश विकासात अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असून विद्यार्थ्यांनी जी. आय.एस. तंत्रज्ञानाच्या माहितीचा उपयोग करून घ्यावा.

" संचार "
" Sanchar "

दिनांक :- 30/01/2019
Date :- 30/01/2019

# 'सोशल'चे श्रमसंस्कार शिबिर एकरूख येथे संपन्न



सोलापूर, दि. २९- सोलापूर विद्यापीठ सोशल महाविद्यालय व एकरूख ग्रामपंचायतीतर्फे एकरूख (उ. सोलापूर) येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसांचे श्रमसंस्कार शिबिर पार पडले.

या शिबिराचे उद्घाटन एकरूखचे सरपंच हबीब जमादार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अन्वर जहागीरदार उपस्थित होते. व्यासपीठावर उपसरपंच शहाजी उडानशिवे व मुख्याध्यापक संजय अनुसे होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांनी भूषविले.

या शिबिरात ७० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, स्वच्छ भारत व आरोग्य विषयावर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. या शिबिरातील उपक्रमांमध्ये हागणदारीमुक्त गाव, आपत्ती व्यवस्थापन, वृक्षलागवड व स्वच्छता आदी विषयांचा समावेश होता. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सोलापूर विद्यापीठाचे विभागीय समन्वयक व कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. एस. नारायणकर व डॉ. टी. बी. लडाफ यांनी परिश्रम घेतले.

या शिबिराचा समारोप ग्रामसेवक शशिकांत कुंभार, उपसरपंच शहाजी उडाणशिवे यांच्या उपस्थितीत पार पडला.

**विविध उपक्रम**

या शिबिरात सोशल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकरूख गावात २० शोषखड्डे मारले तर ७० वृक्ष लावले तसेच गावात वाढलेली झुडपे काढून गाव स्वच्छ केले. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनमार्फत डॉक्टरांकडून ग्रामस्थांनी आरोग्य तपासणी करण्यात आली. जलसंवर्धनाबाबत घरोघरी जाऊन जनजागृती करण्यात आली.

" दैनिक पुढारी "
" Pudhari "

दिनांक :- 08 02 2019
Date :- 08 02 2019



संक्षिप्त



सोलापूर : पथनाट्य स्पर्धेतील विजेत्यांसह महाविद्यालयातील शिक्षक.

## राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धेत सोशल महाविद्यालय प्रथम

**सोलापूर :** रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत महाराष्ट्र मोटार वाहन विभाग, डी.पी. बी. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धेत सोशल महाविद्यालाने प्रथम क्रमांक पटकावला. रस्ता सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन या विषयांवरील पथनाट्य स्पर्धेत एकूण दहा गटांनी सहभाग घेतला होता. हेल्मेट, सिग्नलचा वापर, दारू पिऊन गाडी चालवणे, दुचाकीवर तीन सीट बसवणे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणे आदी विषयांवर पथनाट्यातून जनजागृती करण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. पथनाट्यामध्ये दाऊद कुरेशी, नदीम शेख, प्रतिक कांबळे, सौरभ तम्मेवार, सुलतान शेख, मुस्तफा कुरेशी, साहील मुजावर, दादापीर मुल्ला, आफताब शेख, नुरअहमद शेख आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, प्रा. डॉ. डी. एस. नारायणकर, डॉ. नभा काकडे, प्रा. रईस मिर्झा, डॉ. टी. बी. नदाफ यांनी अभिनंदन केले.

"दैनिक दिव्य मराठी"
" Divya Marathi "

दिनांक :- १३ ०२/२०१९
Date :- 13 02/2019

# तरुणाईने मतदान जागृतीसह पथनाट्य आणि लघुपटाचे सादरीकरणातून दिला संदेश

**सोलापूर** | मतदान हा आपला मूलभूत अधिकार आहे. लोकशाहीचे मोठे शस्त्र आहे. मतदान करा, प्रलोभनाला बळी पडू नका, अशा नानाविध संदेशासह तरुणाईने मतदान जागृतीचे संदेश देणारे पथनाट्य आणि लघुपट सादरीकरण केले. निमित्त होते सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभाग व जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांचे.

सोलापूर विद्यापीठात शनिवारी सकाळी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पथनाट्य स्पर्धेत सोलापूर शहरातील ४ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता तर लघुपट स्पर्धेत ७ संघांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत दयानंद महाविद्यालय, स्पेशल महाविद्यालय, कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर कधी विभागाने सहभाग नोंदविला होता. लघुपट स्पर्धेत केदार मलाडे, प्रशांत शिंदगे, कुरेशी इक्रार, श्याम मडिवाळ, अधिविभाग, दयानंद महाविद्यालय यांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचे संयोजन विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोळकर आणि तेजस्विनी कांबळे यांनी केले. सलमान पीरजादे आणि अमीर तडवळकर यांनी काम पाहिले.

**असा आहे निकाल**

**पथनाट्य विभाग स्पर्धा** - प्रथम - डी.बी.एफ. दयानंद महाविद्यालय

**द्वितीय** -सोशल महाविद्यालय

**तृतीय** - विभागून - कॉलेज ऑफ फार्मसी आणि सोलापूर अधिविभाग

**लघुपट विभाग स्पर्धा** - प्रथम - केदार मालाडे (राष्ट्रीय कर्तव्य )

**द्वितीय**- प्रशांत शिंगे ( माझ कर्तव्य )

**तृतीय** - श्याम मडीवाळ (मतदान पॅटर्न)

जनजागृतीसाठी गीतांची उत्तम साथ

चित्रपटाची हिंदी आणि मराठी गीते आणि शब्दाला शब्द जोडून युवा कलावंतांनी पथनाट्यात पदोपदी गीतांचा आविष्कार केला होता. या गीतांमुळे संपूर्ण स्पर्धेत एक वेगळीच बहार आली होती. मतदारराजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, तू फक्त एक काम कर तुझं मतदान कर, भुलू नको भूलथापांना, मत देऊ नका भ्रष्टाचारांना मत द्या फक्त काम करणाऱ्या लोकांना अशा नानाविध गीतांनी कार्यक्रम बहरला होता.

"दैनिक दिव्य मराठी"
"Divya Marathi"

दिनांक:- १३ / ०२ / २०१९
Date:- 13 / 02 / 2019

# "कल्लाकारी" सोशल की भारी



**रस्ता** सुरक्षा सप्ताहांतर्गत महाराष्ट्र मोटार वाहन विभाग सोलापूर डी. बी. एफ .दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालय व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धेत सोशल महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

रस्ता सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन या विषयावरील रजा पथनाट्य स्पर्धेत एकूण दहा संघानी सहभाग नोंदविला होता. हेल्मेट, सिग्नलचा वापर, दारू पिऊन गाडी चालवणे धोकादायक दुचाकीवर तीन सीट बसवू नका, वाहन चालविताना मोबाइलचा वापर करू नका, या जनजागृतीपर विषयांना हात घालत सोशल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मनोरंजन आणि संदेश याची सांगड घालत या पथनाट्याचे सादरीकरण केले आणि प्रथम क्रमांक पटकाविला या पथनाट्यात दाऊदकुरेशी , नदीम शेख, प्रतीक कांबळे, सौरभ तम्मेवर, सुलतान शेख ,मुस्तफा कुरेशी ,साहिल मुजावर, दादापीर मुल्ला, अहमद शेख, आफताब शेख या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे प्राचार्य एम .ए .दलाल यांनी अभिनंदन केले आहे पथनाट्य यशस्वी करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. एस. नारायणकर, डॉ. नभा काकडे, प्रा. रईसा मिर्झा, डॉ. टी. बी. नदाफ यांनी परिश्रम घेतले.

"दैनिक लोकमत" दिनांक:- २८/०२/२०१९

"Lokmat" Date:- 28/02/2019

# विद्यार्थ्यांमध्ये संशोधनदृष्टी विकसित व्हावी - शेंडगे



उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांसोबत प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, प्रा. डॉ. जैनोद्दीन मुल्ला, प्रा. डॉ. आर. एम. खिलारे, प्रा. डॉ. टी. बी. लडाफ.

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** विद्यार्थी हा संशोधनाभिमुख व्हावा. पदवी अभ्यासक्रमाला संशोधनाची जोड देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने संशोधनवृत्ती बाळगल्यास भारताला महासत्ता होण्यास वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी केले.

एस.एस.ए. आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज सोलापूर व सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उद्योजकता, जागतिकीकरण व आधुनिक व्यवस्थापन' या विषयावर घेण्यात आलेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेत १७० संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. पहिल्या सत्रात उद्योजकता या विषयावर १६ विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. दुसऱ्या सत्रात जागतिकीकरण व आधुनिक व्यवस्थापन या विषयावर १८ विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले.

या शोधनिबंधास प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक निवडण्यात आले. प्रथम क्रमांक रेहान शेख व मुस्तकीम फारुकी (सोशल महाविद्यालय), दुसरा क्रमांक रीमा हिबारे, पल्लवी रणदिवे (हि.ने. महाविद्यालय), दुसरे सत्र प्रथम क्रमांक मिस्बा जहागीरदार, कायनात तीलघर (सोशल महाविद्यालय), दुसरा क्रमांक श्रद्धा मठपती, गौरी संजय (डी.ए.व्ही. कॉलेज), तिसरा क्रमांक किरण येवले, किरण हेवळे (सांगोला विद्यालय), विजयी विद्यार्थ्यांना मानचिन्ह व प्रमाणपत्र डॉ. राजेंद्र शेंडगे यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, डॉ. आर. एम. खिलारे, डॉ. एस. एस. जगताप, प्रा. डॉ. जैनुद्दीन मुल्ला, डॉ. टी. बी. लडाफ आदी उपस्थित होते.

"दैनिक तरुण भारत"
" Tarun Bharat "

दिनांक :- २८/02/२०१९
Date :- 28/02/2019



## संक्षिप्त वृत्त




### विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षेत उतरावे : शेख

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

विद्यार्थ्यांना केवळ पदवी प्राप्त करणे हा एकच शिक्षणाचा उद्देश नसून विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव ठेवून समाज व देशासाठी कार्य करावे. यासाठी अनेक माध्यमे आहेत. त्यातील एक माध्यम स्पर्धा परिक्षा हे आहे. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षेत उतरून कौटुंबिक व देशाच्या प्रगतीमध्ये हातभार लावावा. असे प्रतिपादन पोलीस उपनिरिक्षक रईसा शेख यांनी केले. सोशल महाविद्यालयातील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ.एम.ए.दलाल, डॉ.ए.ए.गदवाल, प्रा.मुबारक सय्यद, डॉ.मुश्ताक शेख, प्रा.लायकअली वड्डो, प्रा.युनूस शेख उपस्थित होते. महाविद्यालयातील पीएच.डी. प्राप्त व नेट-सेट उत्तीर्ण प्राध्यापकांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच एम.ए.उर्दू विषयात सुवर्णपदक प्राप्त सालेहा शेख व बी.ए.उर्दू मध्ये सुवर्णपदक प्राप्त शाहीन अन्सारी या दोन विद्यार्थीनींचा विशेष गौरव करण्यात आला.

"दैनिक सुराज्य"
"SURAJYA"

दिनांक :- १२/११/२०२०
Date :- 12/11/2020

सुराज्य सोलापूर

गुरूवार, दि. १२ नोव्हेंबर २०२०



# 'सोशल' मध्ये शिक्षण दिन साजरा

सुराज्य/सोलापूर : भारतरत्न मौलाना आझाद यांनी पहिले शिक्षणमंत्री या नात्याने भारताच्या शिक्षण व्यवस्थेचा पाया घातला त्यांच्या कारकिर्दीत तंत्र वैज्ञानिक प्रगती व्हावी म्हणून १२६ तांत्रिक शैक्षणिक संस्था सुरु झाल्या. अशा थोर विचारवंतांची जयंती साजरी करुन प्रेरणा घेणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. सोशल महाविद्यालयात मौलाना आझाद यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.ए.गढवाल होते. सूत्रसंचालन कॅप्टन डॉ. गौस शेख यांनी केले. तर आभार डॉ. डी.एस.नारायणकर यांनी मानले.

"दैनिक दिव्य मराठी"
"Divya Marathi"

दिनांक :- १२/११/२०२०
Date :- 12/11/2020

दिव्य मराठी सोलापूर, गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२०

# मौ. आझाद यांनी शिक्षण व्यवस्थेचा पाया रचला

## डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचे प्रतिपादन, सोशलमध्ये राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा

प्रतिनिधी । सोलापूर

बहुसांस्कृतिक राष्ट्रवादाचे पुरसकर्ते, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे व राष्ट्रीय एकात्मतेचे खंदे समर्थक भारतरत्न मौलाना आझाद यांनी देशाचे पहिले शिक्षणमंत्री या नात्याने भारताच्या शिक्षण व्यवस्थेचा पाया रचला. तंत्र वैज्ञानिक प्रगती व्हावी म्हणून युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन, सेकंडरी स्कूल एज्युकेशन कमिशन, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अशा १२६ तांत्रिक शैक्षणिक संस्था सुरू केल्या. अशा थोर विचारवंतांच्या विचारांची आज काळाजी गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

सोशल महाविद्यालयात मौलाना आझाद यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. ए. गढवाल होते. सूत्रसंचालन कॅप्टन डॉ. गौस शेख यांनी केले. आभार डॉ. डी. एस. नारायणकर यांनी मानले.

"दैनिक दिव्य मराठी" दिनांक :- २८/११/२०१९

"Divya Marathi" Date :- 28/11/2019

# सत्तेमुळे इतिहास बदलत नाही : मीर इसहाक शेख

## 'असा होता टिपू सुलतान' पुस्तकाचा लोकार्पण सोहळा

**प्रतिनिधी** | सोलापूर

सत्तेची मूल्ये लादल्यामुळे इतिहासाची फरपट होत आहे. मात्र सत्ता बदलल्याने इतिहास बदलत नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. मीर इसहाक शेख यांनी केले. इतिहास अभ्यासक सर्फराज अहमद लिखित 'असा होता टिपू सुलतान' या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा सोशल महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता.

या वेळीं पुढे बोलताना डॉ. शेख म्हणाले, शहिद टिपू सुलतान यांनी लोकांच्या हितासाठी अनेक उपक्रम राबवले. शेतकऱ्यांना औद्योगिक क्षेत्रामध्ये संधी मिळावी म्हणून प्रयत्न केले. सिंचनाच्या क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवत धरणाची उभारणी केली होती. इतिहासाचे आकलन चुकल्यामुळे भारतीय समाजाला अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे.

भगतसिंग आणि टिपू सुलतान यांच्या इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत चुकीचा आहे. त्यात बदल झाला नाही तर आपल्या समाजाला फार मोठी किंमत चुकवावी लागेल, असे ते म्हणाले.

एजाज शेख यांनी प्रास्ताविक केले. आसिफ इक्बाल यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. वसीम शेख यांनी सूत्रसंचालन केले.




पुस्तक प्रकाशनप्रसंगी अध्यक्षस्थानी रवींद्र मोकाशी होते. या वेळी प्रा. शेख, एम. एन. दलाल, जैनुद्दीन पटेल, आसिफ इक्बाल, शेख एजाज आदी मान्यवर उपस्थित होते.


"दैनिक सकाळ"
"Daily Sakal"

दिनांक :- २८/११/२०१९
Date :- 28/11/2019

# सत्तेमुळे इतिहास बदलत नाही : डॉ. शेख

**सोलापूर, ता. २७ :** सत्तेची मूल्ये लादल्याने इतिहासाची फरफट होत आहे. मात्र, सत्ता बदलल्याने इतिहास बदलत नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. मीर इसहाक शेख यांनी केले.

इतिहास अभ्यासक सर्फराज अहमद लिखित 'असा होता टिपू सुलतान' या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा सोशल महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रा. शेख बोलत होते. याप्रसंगी एम. एन. दलाल, जैनुद्दीन पटेल, आसिफ इक्बाल, शेख एजाज उपस्थित होते. कॉम्रेड रवींद्र मोकाशी अध्यक्षस्थानी होते.



**सोलापूर : 'असा होता टिपू सुलतान'च्या लोकार्पणप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. मीर इसहाक शेख. याप्रसंगी एम. एन. दलाल, जैनुद्दीन पटेल, आसिफ इक्बाल आदी.**

डॉ. शेख यांनी टिपू सुलतान यांनी लोकांच्या हितासाठी अनेक उपक्रम राबवले. शेतकऱ्यांना औद्योगिक क्षेत्रात संधी मिळावी म्हणून प्रयत्न केले. सिंचनाच्या क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवत धरणाची उभारणी केली होती, असे म्हटले. या वेळी कॉम्रेड रवींद्र मोकाशी यांनी इतिहासाचे आकलन चुकल्यामुळे भारतीय समाजाला अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. भगतसिंग आणि टिपू सुलतान यांच्या इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत चुकीचा आहे. त्यात बदल झाला नाही तर आपल्या समाजाला फार मोठी किंमत चुकवावी लागेल ते म्हणाले. शेख एजाज यांनी प्रास्ताविक केले. वसीम शेख यांनी सूत्रसंचालन केले.

"दैनिक लोकमत"
" Lokmat "

दिनांक:– २०/१२/२०१९
Date:– 20/12/2019



सोशल महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. एम. ए. दलाल. यावेळी उपस्थित डॉ. रुपाली रायखेलकर, कृष्णा सकट, डॉ. नभा काकडे आदी.

# अशास्त्रीय माहितीमुळेच एड्सचा धोका

## रुपाली रायखेलकर: सोशल मीडियाच्या माध्यमातून अपुरी माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : विज्ञानयुगात समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. युवकांना नवनवीन माहिती दैनंदिन प्राप्त होत असते. व्हॉट्सअॅप, फेसबुक, यूट्यूब, इन्स्टाग्राम यांच्या वापराचे व्यसन मोठ्या प्रमाणात जडले आहे. या माध्यमातून नको असलेल्या गोष्टी, अपुरी व अशास्त्रीय माहिती मिळाल्यामुळे युवक एड्ससारख्या आजारांना बळी पडत आहेत. हा अनर्थ टाळायचा असेल तर शाळा व महाविद्यालयांकडून याबाबत जनजागृती मोहीम सुरु केली पाहिजे, असे प्रतिपादन छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाच्या एआरटी विभागातील अधिकारी डॉ. रुपाली रायखेलकर यांनी केले.

सोशल महाविद्यालयामध्ये आयोजित एचआयव्ही एड्स जनजागृती कार्यशाळेत त्या बोलत होत्या. सोलापूर सोशल असोसिएशन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, समाज विज्ञान मंडळ, प्रिसिजन फाउंडेशन, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया व जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंध विभागाच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता एचआयव्ही एड्स जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल होते. जिल्हा पर्यवेक्षक कृष्णा सकट, जिल्हा सांख्यिकी अधिकारी दिनेश राठोड, डॉ. नभा काकडे, सुगतरत्न गायकवाड, डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. दीपक नारायणकर, डॉ. सचिन राजगुरु, समुपदेशक प्रदीप शिवशिखरे, प्रशांत कांबळे, रमजान मुजावर, गणेश तांदळे आदी उपस्थित होते.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी आजाराविषयी सखोल माहिती दिली.

तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील शंका दूर केल्या. अध्यक्षीय मनोगतात डॉ. दलाल म्हणाले, युवकांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे. मोबाईलचा कमीत कमी वापर करावा. एड्स, कॅन्सर, मधुमेह अशा विविध आजारांशी स्वत: ज्ञान होऊन इतरांना जागृत केले पाहिजे. या कार्यशाळेत ७० विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

पन्नास विद्यार्थ्यांनी तपासणी करून घेतली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. ए. ए. गढवाल यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नभा काकडे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. दीपक नारायणकर यांनी केले.

"दैनिक लोकमत"
" Lokmat "

दिनांक :- 09/01/2020
Date :- 09/01/2020

# 'सोशल'मध्ये युवती मेळावा

लोकमत 9/1/20

लोकमत न्यूजनेटवर्क

**सोलापूर** : सोशल महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेला युवती मेळावा उत्साहात पार पडला. जयंतीचे औचित्य साधून वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या.

व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. अस्मा खान, डॉ. डी. एस. नारायणकर, डॉ. टी. बी. लदाफ आदी उपस्थित होते. वक्तृत्व स्पर्धेत हाफिजा होटगी ही पहिली आली.

तनजीम शेख ही दुसरी आली. यावेळी नारी शक्ती यावर घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली. प्रा. रईसा मिर्झा यांनी सूत्रसंचालन केले.

"दैनिक सकाळ"
"Sakal"

दिनांक :- ०९/०१/२०२०
Date :- 09/01/2020



सोलापूर : सोशल महाविद्यालयाच्या युवती मेळाव्यात घोषवाक्याचे फलक घेतलेल्या युवती व प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, डॉ. अस्मा खान, डॉ. नभा काकडे, डॉ. ए. ए. गढवाल आदी.

## सोशल महाविद्यालयात युवती मेळावा

**सोलापूर :** येथील सोशल महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित युवती मेळावा घेण्यात आला. मेळाव्यात विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी स्पर्धा घेण्यात आल्या. या वेळी सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मान्यवरांचे स्वागत डॉ. ए. ए. गढवाल यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. अस्मा खान, रा. से. यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. एस. नारायणकर, डॉ. टी. बी. नदाफ, आदी उपस्थित होते. या वेळी वक्तृत्व, काव्यवाचन, घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमास ९८ युवती उपस्थित होत्या. डॉ. अस्मा खान यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नभा काकडे यांनी मेळाव्याची संकल्पना मांडली. प्रा. रईसा मिस व प्रा. तस्निम वड्डो यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आएशा सौदागर यांनी आभार मानले. मेळाव्यास प्रा. सादिक शिपाई, डॉ. युनूस पठाण व प्रा. वैभव भालेराव उपस्थित होते.

# बालिका दिन उत्साहात साजरा

10/1/20 सचार



▶ सोलापूर : सोशल महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त युवती मेळावा घेण्यात आला.

पठाण, प्रा. वैभव भालेराव आदी उपस्थित होते.

**जयभारत शाळा**

उत्तर सदर बझार येथील जयभारत प्राथमिक शाळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. संस्थापिका शारदा फुले, रेणुका कुमार, कमला म्हेत्रे, आशा कोलमी, भारतीबाई आष्टोळे यांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सिद्धम्मा दिड्डी, सुशीला पवार, मीनाक्षी म्हेत्रे, शरणम्मा बावडेकर, सुरेखा पवार, अंबूबाई इटेकर, पूजा रणशिंगारे, कविता शिवशिंगवाले, किरण कय्यावाले, पार्वती मन्सावाले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी, दीपक फुले आदी उपस्थित होते.

**श्राविका विद्यालय**

बुधवार पेठेतील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याचवेळी बालिका दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या सदस्या रेखा राऊत होत्या. शशीकांत कांबळे, बाळासाहेब पौळ यांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते. यावेळी प्रतिभा कंगळे, प्रा. गणेश लेंगरे, प्रा. कल्याणप्पा हायगोंडे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य सुकुमार मोहोळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

**हर्षवर्धन हायस्कूल**

उत्तर सोलापूर तालुक्यातील तळेहिप्परगे येथील हर्षवर्धन हायस्कूलमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याचवेळी बालिका दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष रामेश्वर लोंढे होते. विद्याराणी सुरवसे, तृप्ती चंदनशिवे, पौर्णिमा कांबळे यांनी फुले यांच्या कार्याची माहिती दिली. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल स्वाती शिंदे, मुख्याध्यापक उद्धव ढेकळे, पर्यवेक्षक लक्ष्मण राऊत, मीरा माने, पल्लवी दराडे, एस. टी. चवरे आदी उपस्थित होते.

**नवनाथ वाचनालय**

स्वागतनगर येथील नवनाथ सार्वजनिक वाचनालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. राजश्री गदरे यांच्या हस्ते फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. फुले यांच्या वाचन साहित्याचे पूजन ग्रंथपाल राजू आसादे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभाकर अगनूर, अमर मिठ्ठा, प्रवीण बन्ने, इरफान मैंदर्गी, सर्फराज शेख, सैफन मुल्ला, अश्पाक जमादार, सुजाता घाटगे आदी उपस्थित होते.

**राजर्षी शाहू विद्यालय**

विजापूर रस्त्यावरील राजर्षी शाहू मराठी विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याचवेळी बालिका दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका चंद्रकला गायकवाड होत्या. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या



युवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करुन उद्घाटन करताना डॉ. श्रीकांत येळेगावकर. याप्रसंगी डॉ. एम. ए. दलाल, रवींद्र फताटे, डॉ. नभा काकडे, डॉ. निर्मला खैराटे, दीपक आहुजा, डॉ. ए.ए.गढवाल, डॉ. जैनुद्दिन मुल्ला, डॉ. दीपक नारायणकर, डॉ. सचिन राजगुरु, सुगतरत्न गायकवाड आदी.

लोकमत- २९/१/२०२०

# युवकांनी राष्ट्रपुरुषांचे चरित्र अभ्यासावे

## श्रीकांत येळेगावकर : राष्ट्रीय युवा दिनानिमित्त सोशल महाविद्यालयात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : स्वामी विवेकानंद यांनी राष्ट्राला दैवत मानून भारतात जागृती केली. धार्मिक सहिष्णुतेचा संदेश दिला. ते पौरुष, प्रतिभा आणि चारित्र्य यांचे मूर्तिमंत प्रतीक होते. त्याप्रमाणे युवकांनी भारतातला अनाचार, दुराचार, हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, व्यसनाधिनता संपविण्यासाठी व देश महासत्ताक होण्यासाठी राष्ट्रीय चारित्र्य निर्माण होण्याची आवश्यकता आहे. तसेच युवकांनी राष्ट्रपुरुषांचे चरित्र अभ्यासले पाहिजे, असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

सोलापूर सोशल असोसिएशन्स आर्ट्स अॅन्ड कॉमर्स कॉलेज, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, विकल्प प्रकल्प व रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल होते. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रवींद्र फताटे, डॉ. नभा काकडे, डॉ. निर्मला खैराटे, दीपक आहुजा, डॉ. ए.ए.गढवाल, डॉ. जैनुद्दिन मुल्ला, डॉ. दीपक नारायणकर, डॉ. सचिन राजगुरु, डॉ. युन्नूस पठाण, प्रा. सादिक सिपाही, प्रा. रईसा मिर्झा, डॉ. निखत शेख, शहानवाज शेख, सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

डॉ. एम. ए. दलाल म्हणाले, युवकांनी राष्ट्रपुरुषांचे चरित्र अभ्यासले पाहिजे. त्यांचे संदेश दैनंदिन जीवनात आचरणात आणले पाहिजेत तरच राष्ट्र प्रगती करेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी डॉ. निर्मला खैराटे, सत्यभामा कांबळे यांनी केले. या शिबिरात १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. नभा काकडे यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. ए.ए.गढवाल यांनी मानले.

"सकाळ"
"Sakal"

दिनांक :- २०/०१/२०२०
Date :- 20/01/2020.




सोलापूर : राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करताना डॉ. श्रीकांत येळेगावकर. या वेळी उपस्थित डॉ. एम. ए. दलाल, रवींद्र फताटे, डॉ. नभा काकडे, डॉ. निर्मला खैराटे, दीपक आहुजा, डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. जैनुद्दीन मुल्ला, डॉ. दीपक नारायणकर, डॉ. सचिन राजगुरू, सुगतरत्न गायकवाड आदी.

# 'युवकांत राष्ट्रीय चारित्र्य निर्माण व्हावे'

**सोलापूर, ता. १९ :** स्वामी विवेकानंदांनी राष्ट्राला दैवत मानून भारतात जागृती केली. धार्मिक सहिष्णुतेचा संदेश दिला. ते पौरुष, प्रतिभा आणि चारित्र्य यांचे मूर्तिमंत प्रतीक होते. त्याप्रमाणे भारतातला अनाचार, दुराचार, हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, व्यसनाधीनता संपविण्यासाठी व देश महासत्ता होण्यासाठी युवकांत राष्ट्रीय चारित्र्य निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय कोशाध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

सोलापूर सोशल असोसिएशन्स आर्टस्‌ अँड कॉमर्स कॉलेज, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, विकल्प प्रकल्प व रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ यांच्यातर्फे राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल अध्यक्षस्थानी होते. या वेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रवींद्र फताटे, डॉ. नभा काकडे, डॉ. निर्मला खैराटे, दीपक आहुजा, डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. जैनुद्दीन मुल्ला, डॉ. दीपक नारायणकर, डॉ. सचिन राजगुरू, डॉ. युन्नूस पठाण, प्रा. सादिक सिपाही, प्रा. रईसा मिर्झा, डॉ. निखत शेख, शहानवाज शेख, सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. एम. ए. दलाल म्हणाले, युवकांनी राष्ट्रपुरुषांचे चारित्र्य अभ्यासले पाहिजे. त्यांचे संदेश दैनंदिन जीवनात आचरणात आणले पाहिजेत, तरच राष्ट्र प्रगती करेल.

या वेळी आयक्यूएसी अंतर्गत डॉ. निर्मला खैराटे व सत्यभामा कांबळे यांनी विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी केली. डॉ. नभा काकडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुगतरत्न गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गढवाल यांनी आभार मानले.

## सोशल कॉलेजमध्ये ७० जणांचे रक्तदान

**सोलापूर, ता. १९ :** रक्तदान ही काळाची गरज असल्याचे सामाजिक भान ठेवून सोशल महाविद्यालयाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या वेळी प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, ब्लड बँकेचे डॉ. आनंद वैद्य, शाकीर हकीम आदींनी या वेळी मार्गदर्शन केले. या शिबिरात ६० विद्यार्थी आणि १० शिक्षकांनी सहभाग नोंदवला. डॉ. ए. ए. गढवाल, डॉ. आय. जे. तांबोळी, डॉ. जे. के. मुल्ला, डॉ. टी. बी. लडाफ, डॉ. सचिन राजगुरू, डॉ. डी. एस. नारायणकर, डॉ. गौस शेख, डॉ. नभा काकडे, डॉ. अस्मा खान, प्रा. रईसा मिर्झा, डॉ. निकहत शेख, प्रा. आयेशा सौदागर, डॉ. युनूस पठाण, प्रा. तसनिम वड्डो आदींनी परिश्रम घेतले.

" लोकमत "
" Lokmat "

दिनांक :- २१/०१/२०२०
Date :- 21/01/2020

# उर्दू वाङ्मय मंडळाचे सोशल महाविद्यालयात उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : येथील सोशल महाविद्यालयात उर्दू विभागात उर्दू वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व पुस्तक प्रकाशन कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य अ. जब्बार शेख यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, उस्मानिया हायस्कूलचे मुख्याध्यापक शोएब बलोलखान, उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार, डॉ. गौस शेख उपस्थित होते. याच कार्यक्रमात डॉ. शफी चोबदार यांनी लिहिलेल्या 'निसबे उर्दू ' व डॉ. गौस शेख यांनी लिहिलेल्या 'गुलदस्त - ए-नसर-व-नजम' या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत डॉ. चोबदार यांनी करून उर्दू विभागाची माहिती दिली. शोएब बलोलखान यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, मी याच महाविद्यालयात उर्दू विभागात शिकलो आहे. माझ्या गुरुंच्या पुस्तकाचे प्रकाशन व या विभागाचे वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्याचे भाग्य मला मिळाले आहे ही माझ्यासाठी गौरवास्पद बाब आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. निकहत शेख, तसनीम वड्डो, सोहेल फकीर, शहबाज मनियार, नेहा नदाफ यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. गौस शेख तर आभार डॉ. म. शफी चोबदार यांनी मानले.

यावेळी प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.




सोशल महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात पुस्तकाचे प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, उस्मानिया हायस्कूलचे मुख्याध्यापक शोएब बलोलखान, उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार, डॉ. गौस शेख आदी.

"दैनिक लोकमत"
" Lokmat "

दिनांक:- ०४/०९/२०१९
Date :- 04/09/2019

लोकमत ४/९/१९

## सोशल महाविद्यालयाच्या नियतकालिकेस पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोशल महाविद्यालयाच्या मेसेज या नियतकालिकेस सोलापूर विद्यापीठाच्या स्पर्धेतील उत्तेजनार्थचे बक्षीस मिळाले.


महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके जाहीर करण्यात आली. प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांनी यशस्वितांचे कौतुक केले.

" संचार "
"Sanchar"

दिनांक :- 22/09/2020
Date :- 22/09/2020

# विद्यार्थ्यांनी उर्दूबरोबर मराठी व इंग्रजीवरही प्रभुत्व संपादन करावे

## सोशल महाविद्यालयात उर्दू वाङ्मय मंडळाचे उद्घाटन




**सोलापूर : 'निसबे उर्दू' व 'गुलदस्त- ए- नसर- व- नज़्म' या पुस्तकांच्या प्रकाशनप्रसंगी प्राचार्य जब्बार शेख, एम. ए. दलाल, शोएब बल्लोलखनी, डॉ. म. शफी चोबदार, डॉ. गौस शेख व अन्य.**


संचार प्रतिनिधी


**सोलापूर, दि. २१-** विद्यार्थ्यांनी उर्दू भाषेबरोबर आपल्या प्रदेशाची भाषा मराठी व आंतरराष्ट्रीय भाषा इंग्रजीतवरही प्रभुत्व संपादन करावे आणि महाविद्यालयाकडून शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षण घेऊन कौशल्य प्राप्त करावे, असे प्रतिपादन सोशल उर्दू हायस्कूल व व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्सचे प्राचार्य जब्बार शेख यांनी केले.

सोशल महाविद्यालयात उर्दू विभागात उर्दू वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व पुस्तक प्रकाशन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शेख बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सोशल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, उस्मानिया हायस्कूलचे मुख्याध्यापक शोएब बल्लोलखनी, उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार, डॉ. गौस शेख उपस्थित होते. याच कार्यक्रमात डॉ. म. शफी चोबदार यांनी लिहिलेल्या "निसबे उर्दू' व डॉ. गौस शेख यांनी लिहिलेल्या 'गुलदस्त- ए- नसर- व- नज़्म' या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्राचार्य शेख म्हणाले की, उर्दू माध्यमाने शिकलेला विद्यार्थी इतर विषयांचे अभ्यास करून पुढे एमपीएससी,' यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षाही उत्तीर्ण होऊन चांगल्या पदावर जाऊ शकतात पण त्यांना यासाठी कठीण मैहनत करावी लागेल. प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत डॉ. चोबदार यांनी करून उर्दू विभागाची माहिती दिली.

शोएब बल्लोलखानी यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, मी याच महाविद्यालयात उर्दू विभागात शिकलो असून व माझ्या गुरूंच्या पुस्तकाचे प्रकाशन व या विभागाचे वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्याचे भाग्य मला मिळाले आहे, हे मला एक गौरवासारखी बाब आहे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. दलाल म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आमच्या महाविद्यालयाचे उर्दू विभागाचे कमीत कमी दोन सुवर्णपदक निश्चित असतात, याबद्दल महाविद्यालयला अभिमान आहे. उर्दू विभागाने पुढे अशीच प्रगती करावे व पुढील काळात अजून चांगले विद्यार्थी घडवू असा मला विश्वास आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. निकहत शेख, तसनीम वड्डो, सोहेल फकीर, शहबाज मनियार, नेहा नदाफ यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. गौस शेख यांनी केले तर आभार डॉ. म. शफी चोबदार यांनी मानले.

"दैनिक तरुण भारत"
"Tarun Bharat"

दिनांक:- ३०/०१/२०२०
Date :- 30/01/2020



## सोशल कॉलेजमध्ये उर्दू पुस्तकाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

सोशल कॉलेजमध्ये उर्दू विभागामार्फत प्रा. डॉ. निखत शेख लिखीत शगुफा ए अदब या अभ्यासक्रमावर आधारित पुस्ताकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकात आठ गद्य व चौदा गझलांचे संपादन केले आहे. मौलवी अब्दुल हक्क, नियाज फतेपुरी कन्हैया लाल, सज्जाद जहीर यांचे लेख आहेत. प्रा. डॉ. शफी चोबदार यांनी पुस्तकाचे महत्व विषद केले. प्रा. गौस शेख, प्रा. डॉ. अे. अे. गदवाल, प्रा. डॉ. सचिन राजगुरु, प्रा. आयेशा सौदागर, उपस्थित होते. प्रा. तस्नीम वड्डो यांनी सूत्रसंचालन केले. रईसा मिर्जा यांनी आभार मानले.

"दैनिक सकाळ"
"Sakal"

दिनांक :- ३०/०१/२०२०
Date :- 30/01/2020

» विद्येच्या प्रांगणात




सोलापूर : सोशल उर्दू महाविद्यालयात उर्दू लेखक प्रा. डॉ. साहिब अली यांना श्रद्धांजली अर्पणप्रसंगी शोकसभेत डॉ. शफी जोबदार, डॉ. रशीद शेख, डॉ. एम. दलाल व अन्य.

## थोर विचारवंत प्रा. डॉ. अली यांना सोशल महाविद्यालयात श्रद्धांजली

**सोलापूर :** थोर विचारवंत व उर्दू लेखक, मुंबई विद्यापीठाचे उर्दू विभागप्रमुख प्रा. डॉ. साहिब अली यांचे शुक्रवारी (ता. २४) मुंबईत निधन झाले. त्यानिमित्ताने सोशल महाविद्यालयातील उर्दू विभागातर्फे आयोजित शोकसभेत डॉ. अली यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार यांनी प्रास्ताविकात डॉ. साहिब अली यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. डॉ. अली यांनी ३० संशोधकांना मार्गदर्शन केले तर पुस्तकांचे लेखनही केले. मुंबई विद्यापीठातील उर्दू विभागाला एक गौरवशाली स्थान मिळवून दिले. बेगम कमरून्निसा महाविद्यालयाचे डॉ. अ. रशीद शेख म्हणाले, डॉ. अली यांचे साहित्यिक व शैक्षणिक योगदान खूप मोठे आहे. खादिमाने उर्दू फोरमचे अध्यक्ष विकारअहमद शेख यांनीही डॉ. अली यांच्याबद्दलच्या आठवणी विशद केल्या. दरम्यान, अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांनी डॉ. अली यांची सोशल महाविद्यालयातील भेटीची आठवण करून दिली. डॉ. गौस शेख यांनी सूत्रसंचालन केले.

"दैनिक सकाळ"
"Daily Sakal"

दिनांक:- 02/02/2020
Date:- 02/02/2020

सकाळ » TODAY

» अवती भवती



सोलापूर : सोशल विद्यालयात 'शगुफा ए अदब' उर्दू पुस्तक प्रकाशनप्रसंगी डॉ. एम. ए. दलाल, डॉ. निखत शेख, डॉ. आय. जे. तांबोळी, डॉ. शफी चोबदार, डॉ. एन. ए. काकडे, डॉ. गौस शेख, डॉ. एस. के. राजगुरू उपस्थित होते.

## सोशल महाविद्यालयात 'शगुफा ए अदब' पुस्तकाचे प्रकाशन

**सोलापूर :** येथील सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेज सोलापूर उर्दू विभागतर्फे प्रा. डॉ. निखत शेख लिखित 'शगुफा ए अदब' या अभ्यासक्रमावरील आधारित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकात आठ गद्य व १४ गझलांचे संपादन करण्यात आलेले आहे. या ग्रंथात ख्यातनाम उर्दू साहित्यकार मौलवी अब्दुल हक्क, नियाज फतेपुरी, कन्हैया लाल, सज्जाद जहीर या मान्यवरांचे लेख समाविष्ट आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या बी. कॉम. भाग-एकच्या अभ्यासक्रमाला हे पुस्तक असून विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे. प्रा. डॉ. निखत शेख यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. शफी चोबदार यांनी पुस्तकाचे महत्त्व विशद केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल हे होते. प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी, डॉ. नभा काकडे, प्रा. डॉ. गौस शेख, प्रा. डॉ. ओ. ओ. गदवाल, प्रा. डॉ. सचिन राजगुरू, प्रा.आयेशा सौदागर हे उपस्थित होते. प्रा. तस्नीम वड्डो यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रईसा मिर्जा यांनी आभार मानले.

सकाळ न.पेपर
Date:- 02-02-2020

" तरुण भारत "
" Tarun Bharat "

दिनांक :- ०६/०२/२०२०
Date :- 06/02/2020



# सोशल कॉलेजमध्ये कार्यशाळा

**सोलापूर,दि. ५ फेब्रुवारी-**

सोशल महाविद्यालयात आयोजित उद्योजकता, जागतिकीकरण, व आधुनिक व्यवस्थापन या एक दिवसीय विद्यापीठस्तरीय संशोधन कार्यशाळा झाली.प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल होते. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वाणिज्य महाविद्यालयातून १४९ विद्यार्थी व १४. शिक्षक सहभागी झाले होते. दोन सत्रामध्ये १५ शोध निबंध सादर करण्यात आले. उत्कृष्ठ शोधनिबंधांना पुरस्कार देण्यात आले. शोधनिबंध सादरीकरणाचे परीक्षक जैनोद्दिन मुल्ला यांनी काम पाहिले. संयोजक म्हणून प्रा. डॉ. जैनोद्दीन मुल्ला, प्रा. डॉ. टी.बी. लडाफ यांनी परिश्रम घेतले.

दै. संचार दि. १५-०२-२०२०

# मुलींनी उच्च शिक्षणाद्वारे उज्ज्वल करिअर करावे : न्या. गाडे

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. १४- स्त्रियांनी चूल आणि मूल यापुरते मर्यादित न राहता उच्च शिक्षण घ्यावे. उच्च शिक्षणाचा समाजासाठी उपयोग करवा. उच्च शिक्षणाने आपले करिअर सुंदर करण्याबरोबरच समाज व देशाच्या प्रगतीसाठीही कार्य करावे, असे न्यायाधीश कोमल गाडे यांनी केले.

जिनदा दिलाने शोब-ए-उर्दू आणि सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागाच्यावतीने बी.ए. उर्दूमध्ये मोहसिना सय्यद आणि एम.ए. उर्दूमध्ये आसमा यादगिरी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी न्यायाधीश गाडे बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे प्रभारी प्र कुलगुरू



डॉ. विकास कदम, डॉ. ए. ए. गदवाल, उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार आदी उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल होते. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. म. शफी चोबदार यांनी केली.

डॉ. कदम म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आजच्या अत्याधुनिक जगात वावरत असताना आपल्या माता-पितांची सेवा करणे व त्यांचा आदर करणे विसरू नये. प्रगती केल्यानंतर आपल्या गुरुजनांना, आपली शाळा व आपल्यावरील समाजाचे उपकार विसरू नये. समाजऋण फेडण्याचा प्रयत्न करावा.

उर्दू संशोधन केंद्रातर्फे पहिल्या पीएच.डी. पदवी मिळविल्याबद्दल डॉ. सुमैय्या बागबान तसेच सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तसनीम वड्डो व राष्ट्रीय पातळीवर शरीर शौर्य स्पर्धेत निवड झाल्याबद्दल सुहेल काझी यांचाही सत्कार करण्यात आला. डॉ. ए. ए. गदवाल यांनी एम.फील व पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसाठी रिसर्च मेथडॉलॉजी हे पुस्तक प्रकाशन केल्याबद्दल त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गौस शेख यांनी केले तर आभार शाहबाज मनियार यांनी मानले.

दै. पुढारी दि. १४-०२-२०२०

# मुलींनी उच्च शिक्षण पूर्ण करण्याचे ध्येय ठेवावे : न्या. कोमल गाडे

## सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विषयात सुवर्णपदक विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी । सोलापूर

स्त्रियांनी चूल आणि मूलपुरते मर्यादित न राहता उच्च शिक्षण घ्यावे. आपल्या शिक्षणाचा समाजासाठी उपयोग करावा. मी माझे उच्च शिक्षण लग्न झाल्यानंतर व मुले झाल्यानंतर एमपीएससीची परीक्षा देऊन न्यायाधीश झाले. दिवाणी न्यायालय कनिष्ठस्तर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी म्हणून काम करत आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी मनात जिद्द पाहिजे, असे प्रतिपादन न्या. कोमल गाडे यांनी केले.

जिनदा दिलाने शोब-ए-उर्दू आणि सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागाच्या वतीने यावर्षी बी.ए. उर्दूमध्ये मोहसीना सय्यद आणि एम. ए. उर्दूमध्ये आसमा यादगिरी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल सोशल महाविद्यालयात सत्कार झाला. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे प्रभारी प्रो-कुलगुरू डॉ. विकास कदम, न्यायधीश कोमल गाडे, डॉ. ए. ए. गदवाल, उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार, डॉ. गौस शेख, शाहबाज मनियार उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.ए. दलाल होते. प्रस्तावना डॉ. म. शफी चोबदार यांनी केली. माजी विद्यार्थ्यांची संघटना जिनदा दिले शोब-ए-उर्दूची ओळख अध्यक्ष शाहबाज मनियार यांनी केली.

महाविद्यालयाच्या उर्दू संशोधन केंद्रातर्फे पहिल्या पीएच.डी. पदवी मिळविल्याबद्दल डॉ. सुमैय्या बागबान तसेच सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तसनीम वड्डो व राष्ट्रीय पातळीवर शरीर शौर्य स्पर्धेत निवड झाल्याबद्दल सुहेल काझी यांचाही सत्कार करण्यात आला. डॉ. ए. ए. गदवाल यांनी एम. फिल. व पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसाठी रिसर्च मेथडॉलॉजी हे पुस्तक प्रकाशन केल्याबद्दल त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात निजामोद्दीन शेख, इम्तियाज शेख, रफीक खान, शफी कॅप्टन, खालीद मन्सूर, नजीर मुन्शी, अ. मन्नान शेख उपस्थित होते. शाकीर कामले, इसा शेख, सोहेल फकीर, शाहबाज मनियार, सोहले काझी, इसा सय्यद, कादीरहुसेन चोबदार, फजलुल्ला शेख, जैद तांबोळी, मुस्सदीक शेख यांनी सहकार्य केले.

सकाळ
दै. दि. १५-०२-२०२०

# 'उच्च शिक्षण घ्या पण, पालकांचा आदर ठेवा'

**सोलापूर, ता. १४ :** स्त्रियांनी चूल व मूल एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता उच्च शिक्षण घ्यावे, ते समाजासाठी उपयोगात कसे आणता येईल याचा विचार करावा. उच्च शिक्षण घेऊन नोकरी करताना पालकांचा आदर कायम ठेवा, असा सल्ला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. विकास कदम यांनी दिला.

जिनदा दिले शोब-ए-उर्दू आणि सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागतर्फे पदवी व पदव्युत्तर कला शाखेच्या उर्दू विभागात विद्यापीठाकडून सुवर्णपदक प्राप्त मोहसिना सय्यद व आसमा यादगिरी यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी डॉ. कदम बोलत होते. याप्रसंगी डॉ. सुमय्या बागबान, तस्नीम वड्डो, राष्ट्रीय पातळीवर शरीर शौर्य स्पर्धेत




**सोलापूर : जिनदा दिले शोब-ए- उर्दू व सोशल महाविद्यालयातर्फे आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सोलापूर विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. विकास कदम.**

निवड झालेले सुहेल काझी यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. ए. ए. गदवाल यांनी एम.फील व पीएच. डी.च्या विद्यार्थ्यांसाठी रिसर्च मेथडॉलॉजी हे पुस्तक प्रकाशन केल्याने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी न्यायधीश कोमल गाडे, प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल, डॉ. ए. ए. गदवाल, उर्दू विभागप्रमुख डॉ. शफी चोबदार, डॉ. गौस शेख, जिनदा दिले शोब-ए-उर्दूचे अध्यक्ष शाहबाज मनियार आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाकीर कामले, इसा शेख, सोहेल फकीर, सोहेल काझी, इसा सय्यद, कादीरहुसेन चोबदार, फजलुल्ला शेख, जैद तांबोळी, मुस्सदीक शेख यांनी परिश्रम घेतले.

दै. लोकमत दि. १५-०२-२०२०

**कोमल गाडे :** सोशल महाविद्यालयात उर्दू विभागाच्या वतीने सुवर्णपदकप्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

# मुलींनी उच्च शिक्षण पूर्ण करण्याची जिद्द ठेवावी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** स्त्रियांनी चूल आणि मूल यापर्यंतच मर्यादित न राहता उच्च शिक्षण घ्यावे. आपण घेतलेले उच्च शिक्षण हे समाजासाठी उपयोगी होईल का हे पाहावे. स्त्रियांना उच्च शिक्षण पूर्ण करण्याची जिद्द मनामध्ये पाहिजे, असे मत न्या. कोमल गाडे यांनी व्यक्त केले.

सोशल महाविद्यालयाच्या उर्दू विभागाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सुवर्णपदक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोशल महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना न्या. गाडे बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठाचे प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. विकास कदम, डॉ. ए. ए. गदवाल, उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार, डॉ. गौस शेख, शाहबाज मनियार आदी उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल होते.

यावेळी डॉ. कदम म्हणाले, विद्यार्थ्यांनी आजच्या अत्याधुनिक जगात वावरताना आपल्या माता-पितांची सेवा करणे व त्यांचा आदर करणे विसरू नये. प्रगती केल्यानंतर आपले गुरुजन, आपली शाळा व आपल्या समाजाचे उपकार विसरु नये. समाजऋण फेडण्याचे प्रयत्न करावेत. प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल म्हणाले, या विभागात दरवर्षी कमीत कमी दोन सुवर्णपदके तर निश्चित असतात, ही एक महाविद्यालयाला अभिमानाची बाब आहे.

यावेळी निजामोद्दीन शेख, इम्तियाज शेख, रफिक खान, शफी कॅप्टन, खालीद मन्सूर, नजीर मुन्शी, अ. मन्नान शेख उपस्थित होते. हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाकीर कामले, इसा शेख, सोहेल फकीर, शाहबाज मनियार, सोहेल काझी, इसा सय्यद, कादीरहुसेन चोबदार, फजलुल्ला शेख, जैद तांबोळी, मुस्सदिक शेख यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. म. शफी चोबदार यांनी केली. सूत्रसंचालन डॉ. गौस शेख यांनी केले तर आभार शाहबाज मनियार यांनी मानले.




**सोशल महाविद्यालयात मार्गदर्शन करताना न्या. कोमल गाडे यावेळी मंचावर डॉ. एम. ए. दलाल, डॉ. ए.ए. गदवाल, डॉ. म. शफी चोबदार, डॉ. गौस शेख, शाहबाज मनियार आदी.**

## यांचा झाला सत्कार

◆ विद्यापीठात बी. ए. उर्दूमध्ये मोहसीना सय्यद आणि एम. ए. उर्दूमध्ये आसमा यादगिरी यांनी सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. पीएच. डी. पदवी मिळविल्याबद्दल डॉ. सुमैय्या बागबान तसेच सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तसनीम वड्डो व राष्ट्रीय पातळीवर शरीरसौष्ठव स्पर्धेत निवड झाल्याबद्दल सुहेल काझी, डॉ. ए. ए. गदवाल यांनी एम. फिल. व पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसाठी रिसर्च मेथडॉलॉजी हे पुस्तक प्रकाशन केल्याबद्दल त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

संचार

दिनांक:- २८/०२/२०



# एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा

## कर्नल प्रमोदकुमार रावत यांचे आवाहन

**शहर संचार**

**सोलापूर,दि.२६-** एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी जीवनात नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वाटचाल केल्यास निश्चित यश मिळेल. विद्यार्थ्यांनी समाजातील दीनदुबळ्या लोकांची सेवा करावी तसेच आदर्श नागरिक होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावा, असे आवाहन नऊ महाराष्ट्र बटालियन एन. सी.सी चे कंपनी कमांडर कर्नल प्रमोदकुमार रावत यांनी केले.

सोशल महाविद्यालयात माजी प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रावत बोलत होते. माजी प्राचार्य डॉ. दलाल यांनी जिद्द, चिकाटी व नियोजनबद्ध कठोर परिश्रम केल्यास निश्चित यश मिळेल, असे सांगितले. कार्यक्रमाची प्रस्तावना कंपनी कमांडर कॅप्टन डॉ. गौस शेख यांनी केले. कॅडेट अफसाना नदाफ यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास सुभेदार मेजर बहादूर गुरव, सुभेदार गजानन गुरु, सुभेदार मंडलिक जावा; हवालदार बापूसाहेब पाटील आणि हवालदार सिंग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅडेट चोबदार यांनी केले. तर कॅडेट इम्रान यांनी आभार मानले.




सोलापूर : सोशल महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमप्रसंगी माजी प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांचा सन्मान करताना कर्नल प्रमोदकुमार रावत. सुभेदार मेजर बहादूर गुरव, गजानन गुरु व अन्य.

"दैनिक तरुण भारत"
Tarun Bharat

दिनांक:- ०९/०३/२०२०
Date :- 09/03/2020




# मनापासूनच्या प्रयत्नाचे फळ म्हणजे पारितोषिक

## संतोष पाटील महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि.८ मार्च-**

सकारात्मक विचार आणि दूरदृष्टी ठेवून मार्गक्रमण केल्यास यश मिळते. मी इच्छित ध्येय गाठू शकतो. त्यासाठीची तयारी माझी आहे, असा विचार करून परिश्रम घेतले पाहिजे. मनापासून केलेल्या प्रयत्नाचे फळ म्हणजे पारितोषिक होय, असे प्रतिपादन सोलापूर येथील सोशल कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांनी केले.

ते मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या १८ व्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष पी. एल. कोळी होते. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे, विश्वस्त यू. बी. डांगे, प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. प्राचार्य डॉ.बी.एम. भांजे यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापकांची उद्घोषणा प्रा. डॉ. भगवान आदटराव, प्रा. डॉ. एस. एस. तोरवी, प्रा.श्रीमती बी. एस. कोरे, प्रा. विजय साळवे यांनी केली. पारितोषिक वितरण समारंभाचे समन्वयक प्रा. मारुती हजारे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. दीपक देडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. जवाहर मोरे यांनी सूत्रसंचालन केले. निलम स्वामी हिने आभार मानले.

दैनिक पुढारी
Pudhari

दिनांक :- १२/०३/२०२०
Date :- 12/03/2020

पुढारी - 12/3/20

# मनापासूनच्या प्रयत्नाचे फळ म्हणजे पारितोषिक

## प्राचार्य डॉ. दलाल यांचे प्रतिपादन

**दक्षिण सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

सकारात्मक विचार आणि दूरदृष्टी ठेवून मार्गक्रमण केल्यास यश मिळते. मी इच्छित ध्येय गाठू शकतो. त्यासाठीची तयारी माझी आहे, असा विचार करून परिश्रम घेतले पाहिजे. मनापासून केलेल्या प्रयत्नाचे फळ म्हणजे पारितोषिक होय, असे प्रतिपादन सोलापूर येथील सोशल कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल यांनी केले.

ते मंद्रुप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या १८ व्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष पी. एल. कोळी होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे, विश्‍वस्त यू.बी. डांगे, प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे आदी उपस्थित होते.

डॉ. दलाल म्हणाले, स्वत:चा शिल्पकार स्वत:च झाले पाहिजे. कष्टाला पर्याय नसतो. सकारात्मक विचार व दृष्टीकोनाने संकटावर मात करता येते व यशस्वी होता येते. एखाद्या क्षेत्रात आवड निर्माण करून निश्‍चय करून मार्गक्रमण केले पाहिजे. अध्यक्षपदावरून बोलताना पी.एल. कोळी म्हणाले, प्रत्येकाने ध्येय निश्‍चित करून त्या दिशेने मार्गक्रमण करावे. नियोजन, सातत्य, सराव याच्या माध्यमातून यश मिळते. अशक्य हा शब्द आपल्या शब्दकोशातून काढून टाकावा. सर्व काही शक्य आहे. स्पर्धेच्या जगात विशेष प्राविण्य असल्याशिवाय चालणार नाही. चौफेर वाचन आणि अभ्यासाने ध्येय गाठता येते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. प्राचार्य डॉ. बी.एम. भांजे यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापकांची उद्‌घोषणा प्रा. डॉ. भगवान आदटराव, प्रा. डॉ. एस. एस. तोरवी, प्रा. बी. एस. कोरे, प्रा. विजय साळवे यांनी केली. पारितोषिक वितरण समारंभाचे समन्वयक प्रा. मारुती हजारे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.डॉ. दीपक देडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. जवाहर मोरे यांनी सूत्रसंचालन केले. नीलम स्वामी हिने आभार मानले.



**दक्षिण सोलापूर : संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविताना मान्यवर.**